ग्रामसेवकाकडील अतिरिक्त कामे कमी करण्यासाठी मा.प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करणे बाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१९/प्र.क्र.७९४/आस्था-७
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१.
दिनांक :- १९ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना :--

ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक यांनी त्यांच्याकडे वारंवार अतिरिक्त कामे दिली जात असल्याचे निवेदनाद्वारे शासनाच्या निर्दशनास आणले आहे.

या संदर्भात मा.मंत्रीमहोदयांकडे संबंधीत ग्रामसेवक संघटनांच्या बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत हा मुद्दा संबंधीत संघटनांनी शासनाच्या निदर्शनास आणला. या बैठकीत संबंधीत संघटनांनी ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे ग्राम विकास विभागाशी संबंधीत नियमित कामे सुपूर्द केली जातात. त्या सोबत शासनाच्या अन्य विभागाची कामे देखील सुपूर्द केली जातात. या सर्व कामांचा ताण नियमित कामकाज करतांना ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांना होत होता. त्यामुळे या संदर्भात प्रधान सचिव , ग्राम विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमुन ग्रामसेवक, ग्राम विकास अधिकारी यांचेकडे सुपूर्द केलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी समिती नेमण्याबाबत शासनाने सकारात्मकता दर्शविली होती.

शासन निर्णय :--

शासनाने वर नमुद केलेल्या परिस्थितीत ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी पुढील प्रमाणे समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे.

१. प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग)	-	अध्यक्ष
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	-	२ सदस्य
३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी	-	२ सदस्य
४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गटविकास अधिकारी	-	२ सदस्य

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201909192207589020 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.09.20 14:50:53 +05'30'

(प्रि.शं.कांबळे)
अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व सह/उपसचिव, ग्रामविकास विभाग.
४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
५. सर्व अतिरिक्त कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
६. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
७. सर्व गट विकास अधिकारी, जिल्हा परिषदा.
८. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग.
९. निवड नस्ती आस्था-७